# कॅक्टसफ्लॉवर

अनुराधा पोतदार

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९२



REFBK-0022844
REFBK-0022844

कॅक्टसफ़्लॉवर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# कॅक्टसफ्लॉवर

अनुराधा पोतदार

REFBK-0022844
REFBK-0022844

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : २७३

पहिली आवृत्ती : डिसेंबर १९७९

© १९७९, अनुराधा पोतदार

मुखपृष्ठ
अरुण कालवणकर

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत : अकरा रुपये

दर्शन, यशोधरा
श्रीनिवास आणि जया यांना

ही आठवण तुमच्यापाशी राहावी.

# अनुक्रम


पृष्ठ

१ पहाटवाऱ्याची नाचरी पावलं
(२१·९·६९)
कोवळ्या चंद्रकोरीचं इवलंसं हासू
(१४·१०·६९)
२ शब्दांच्या चोची आज वासल्या
आहेत (८·११·६९)
फिरस्त्यांची पालं (९·११·६९)
३ पहाटेचं चांदणं
(२८·११·६९)
ही प्रीती (२२·१·७२)
४ अधुऱ्या स्वप्नातून
(१५·९·७१)
मेलेल्या मातीवर
(२१·९·७१)
५ जीवन्मृताला (२२·९·७१)
मी असते (२२·९·७१)
६ या साऱ्यांसाठी (२३·९·७१)
हे मला आज सांगू नकोस
(२५·९·७१)
७ माझी वाणी मुकी झाली तेव्हा
(२४·९·७१)
तू गेल्यावर (२३·६·७१)
८ माझ्या निरभ्र देहावर
(२५·९·७१)
भरू म्हटलं म्हणून
(२५·९·७१)
९ तू गेलास—नेहमीसाठी
(२५·९·७१)

पृष्ठ

१० कधीकधी (२६·९·७१)
तो अज्ञात प्रदेश मीच आहे
(२६·९·७१)
११ आपल्याच ओठांचं हे गाऱ्हाणं
(२६·९·७१)
पौर्णिमा गेली तर जाऊ दे
(३·१०·७१)
१२ तू येतेस (२८·९·७१)
अजूनही सारं सोपं होईल
(१९·१०·७१)
१३ पाठ फिरवली तरी
(१९·१०.७१)
पाण्यामधलं माझं हे घर
(१४·१०·७१)
१४ चला, उशीर होईल निघायला
(१२·१०·७१)
मी परत आले आहे
(जून १९७५)
१५ या निरर्थक नाटकावर
(२१·१०·७१)
तरच माझ्यातली ही शापित
द्रौपदी (१·११·७१)
१६ पिकत निवत गेलेल्या उन्हासारखी
(२२·१०·७१)
तुझं आईपण (३·११७·१)
१७ पायांतलं बळ बघता बघता
ओसरून गेलं (१·११·७१)

पृष्ठ

१७ जे करावंसं वाटतं तेही (२८·१०·७१)
१८ हे अवघं माथं (१४·११·७१)
निद्रेची अफीम (१७·११·७१)
१९ या भिंतीच म्हणून राहिल्या आहेत (११·१२·७१)
तुमचे हे सोज्वळ संसार (१२·१२·७१)
२० अंधार (१२·१२·७१)
सुख बोलत नाही (डिसेंबर ७१)
२१ या शब्दांचं हे तीव्र रसायन (डिसेंबर ७१)
मी विचारलं (जानेवारी ७२)
२२ तो जिताजागता कप्तान (२४·१२·७१)
अपरात्री (एप्रिल ७२)
२३ दुःखाला इलाज नसतो (२७·१·७२)
हे चांदणं (१२·३·७२)
२४ ती (१२·३·७२)
स्पर्श (फेब्रुवारी ७२)
२५ माझ्या अनिद्र रात्रीचे हुंकार (२४·२·७२)
२६ प्रेमी मन (२९·१·७२)
दोष नाही तुझा (मे ७२)
२७ उंटानं पाणी पिऊन घ्यावं (जून ७२)
त्या अखेरच्या प्रलयाची (२९·८·७४)
२८ शिंपला (जून ७२)

पृष्ठ

२८ आईचे डोळे (४·८·७४)
२९ हे विसरणार नाहीस ना ? (४·८·७४)
झुळझुळत्या गवताच्या पात्यापात्यातून (२८·७·७४)
३० आता तरी (८·८·७४)
दूर आभाळरेषेपाशी (मे ७६)
३१ हा झाकोळलेला दिवस (९·८·७४)
जगण्याचं पात्र (२३·५·७३)
३२ लावण्याचं हे जीवघेणं रसायन (१·६·७३)
आषाढातल्या आभाळाला (७·६·७३)
३३ आभाळ (५·६·७३)
माझं हरपलेलं आईपण (२७·७·७४)
३४ तुमची गाणी, तुमची विराणी (८·६·७३)
ही उदासी (३·८·७४)
३५ या कडुनिंबाचा (८·६·७३)
मुक्त व्हावं लागतं स्वतःलाच (१३·७·७४)
३६ तू—मी (१५·७·७४)
आयुष्याच्या हमरस्त्यावर (३०·६·७३)
३७ त्या अखेरच्या मुक्तीचं रूप (मे ७५)
तो आकाशातला धन्वंतरी (जून ७२)

पृष्ठ
३८ ही मळभलेली हवा
(२१·५·७३)
या शीतपेटीच्या पांढऱ्याशुभ्र
कबरीत (जून ७२)
३९ ती तूच असशील (मे ७३)
माझं हसू (जून ७२)
४० सावली (मे ७३)
'नो प्रॉब्लेम' (मे ७५)
४१ देवाघरलं हेच सोलीव स्वप्न
(मार्च ७५)
पहाटेच्या रामप्रहरी (मार्च ७५)
४२ सारीच वस्त्रं ओरबाडली
(मार्च ७५)
हे अवलिये कलावंत (मे ७५)
४३ एक अनोखं गीत (मार्च ७५)
अंधारात गुरफटलेल्या
(एप्रिल ७५)
४४ निरोप घेता घेता पाहिलं
(मे ७५)
४५ पंख पसरून झेपावू दे दूर
(मार्च ७५)
४६ मिटून घेऊ दे डोळे (एप्रिल ७५)
ती धूळभरली, मरगळलेली वाट
(मार्च ७५)
४७ ते हिरवेगार डोंगर (मे ७५)
त्यांची तजेल पावलं (मार्च ७५)
४८ या लखलखत्या दीपोत्सवात
(मे ७५)
उशामाथ्याशी प्रचंड पहाड
(मार्च ७५)

पृष्ठ
४९ तूही कसा तो भेटलाच नाहीस
(मे ७५)
एकटेपण किती एकटं असतं
(मे ७५)
५० ते मला आज कळतं आहे
(मे ७५)
आणि तरीही ती आपलीच
असतील (मार्च ७५)
५१ दुःख (मे ७६)
आधीच मला उशीर झाला आहे
(मार्च ७५)
५२ निपटून टाकले डोळे (मे ७६)
आठवते ती संध्या भिजली?
५३ असेच हवे होते (मे ७६)
कडुनिंबांच्या झरोक्यातून
(१३·११·७४)
५४ आज मीच झाले आहे (मे ७३)
सारी दारं बंद केलीस तरी
(१९·१०·७४)
५५ हळदमाखल्या अंगासारखा
(९·१०·७४)
काळ्या मातीत रुजलेले
(२४·९·७४)
५६ मी अशी स्वतःतच बोलू लागले
(मे ७५)
आभार! (५·९·७४)
५७ फक्त तुटून पडतं (१२·१०·७१)
सारंच साजरं करायचं
(मार्च ७५)
५८ घरच उरत नाही (ऑगस्ट ७९)

## पहाटवाऱ्याची नाचरी पावलं

पहाटवाऱ्याची नाचरी पावलं असतात दुडदुडत्या बाळासारखी :
शेवग्याच्या पानांतून ती लुडबुडू लागतात
तेव्हा त्या केल्यासवरल्या काळजालाही मायेचं उधाण येतं.
शैशवाची कोवळी पावलं लागतात थरथरू त्याच्याही पिकल्या पानांतून
आणि हिरव्या नक्षीला येते सय आईच्या पदराची.
पहाटवाऱ्याला जोजवताना
शेवग्याच्या कापऱ्या हातांच्या होतात चिमण्या बाळमुठी :
या मोदकमुठीत असतो स्वप्नांचा चिमणचारा.
पहाटवारा जातो पळून तेव्हा शेवग्याची पानं संथपणं गळत असतात.

## कोवळ्या चंद्रकोरीचं इवलंसं हासू

कोवळ्या चंद्रकोरीचं इवलंसं हासू
आभाळातून सांडलं
शेवग्यानं पकडलं
पानांनी झेलल
वाऱ्यानं जोजवलं
कुशीला वळलं
झोपून गेलं...

## शब्दांच्या चोची आज वासल्या आहेत

शब्दांचे ओठ वासले आहेत आज दीनवाण्या पाखरासारखे,
पोरक्या पोरासारखी मालवली आहे त्यांच्या मुखाची नव्हाळी,
कोमेजल्या फुलांसारख्या त्यांच्या माना झुकल्या आहेत.
आजवर निववली त्यांनी माझ्या व्याकुळ जीवाची तल्खली;
आज त्यांच्याच वासलेल्या चोचींत पिळायला हवेत मला
माझ्या भावनेचे ठिबकते थेंब.
पण विरही जीवाच्या धगीत सुकले आहेत भावनेचे पाझरते ओघळ
आणि रित्या किनाऱ्यावर उरल्या आहेत परतल्या लाटांच्या नागमोडी खुणा
शब्दांच्या चोची आज वासल्या आहेत
आणि माझेही ओठ तहानले आहेत.

## फिरस्त्यांची पालं

फिरस्त्यांची पालं उठून गेल्यावर पाहिल्या
मोकळ्या मैदानातल्या तीन दगडांच्या चुली,
अस्वलांना बांधलेल्या दगडी खुंटांच्या खुणा
आणि अवतीभवती विखुरलेली पांढुरकी राख.
मनाच्या कोपऱ्यातही हलल्या नाहीत अजून तीन दगडांच्या थंडगार चुली,
इंधनावाचून धुरकटलेल्या,
आणि अवतीभवती विखुरली आहे विझल्या स्वप्नांची रांगोळी.
—फिरस्त्यांची पालं मात्र कधीच उठून गेली आहेत.

## पहाटेचं चांदणं

पहाटेचं चांदणं पाहिलं की नकळता डोळ्यांत पाणी येतं.
रात्रीच्या उत्फुल्ल चांदण्यासारखं ते नसतं उन्मादानं रसरसलेलं;
त्याच्या अदमुऱ्या प्रकाशात आसवांचं ओलेपण मिसळलेलं.
पहाटेचं चांदणं आपल्या निरोपासारखं :
पापणीआड दडलेल्या आसवांनी भिजलेल्या त्या क्षणांसारखंच
पहाटेचं चांदणंही गहिवरलेलं;
सरत्या घडीची मिठी सोडवताना तेही आतआत व्याकुळलेलं.
—पहाटेचं चांदणं पाहिलं की नकळता डोळ्यांत पाणी येतं,
निरोपाच्या क्षणी जे आतआत साकळलेलं असतं.

## ही प्रीती

तुझ्या शब्दांचे हे आसूड असेच डसू देत
माझ्या उघड्या पाठीवर.
मेलेल्या सर्पासारखा विसविशीत झालेला पाठीचा हा कणा
ताठरून उभा राहू दे पुन्हा
कात टाकलेल्या नागासारखा, फडा काढून.
जळजळत्या जिभेनं आव्हान देऊ दे तुलाही
या लसलसत्या प्रीतीचं,
प्रीतीच्या मंत्रबळाचं.
ही प्रीती हाच या पाठीचा कणा आहे, हे तुलाही अजून माहीत नाही.

## अधुऱ्या स्वप्नातून

अधुऱ्या स्वप्नातून मध्यरात्री एकाएकी जाग आली
तेव्हा अंधारात हरवलेलं एक पाखरू
पंखांची फडफड करीत खोलीभर घिरट्या घालीत होतं.
त्याच्या आंधळ्या दृष्टीला दिशा नव्हती,
परतीची वाट सापडत नव्हती.
—माझ्या अशरीरी जीवाचं पाखरूही एका अपरात्री
देहाची लक्तरं टाकून झेपावत तुझ्यापाशी येईल...
पंखांची मुकी फडफड करीत सांगू लागेल,
"मी मुक्त झाले", "मी मुक्त झाले..."
पण भय वाटतं...
भय वाटतं
तुला जाग येईल का?

## मेलेल्या मातीवर

मेलेल्या मातीवर रक्ताची शिंपण झाली :
माती लाल झाली;
मातीतून फुटलेले अंकुर बघता बघता तरारून आले,
सरसरत वर गेले, वर वर गेले.
मातीचा हळवेला, दुखावला जीव उसासत राहिला :
"जरा थांब, जरा जवळ राहा."
तिच्या उरातलं रक्त शोषून टटतटलेले अंकुर
इतके दूर गेले, इतके दूर गेले...
तिची हाक तिच्यापाशीच राहिली.

## जीवन्मृताला

जीवन्मृताला ज्यानं जीवन दिलं
तेच असं प्राणांशी बेतेल
हे स्वप्न कुणाला पडलं होतं ?
तुला नाही; मलाही नाही.
विस्तवाशी खेळताना जपून खेळता येत नाही,
हे विसरले मीच वेडी.
(ज्यानं त्यानं जपायला हवी ना आपलीच मातीची कुडी!)
आता रक्ताची तल्खली सुकल्या ओठांनी गिळावी लागली
तरी कापायला हवी मीच
वाऱ्यावर भरकटलेली ही वावडी.

## मी असते

मी असते, हसते, घटकाभर असणारही आहे.
पथारी मात्र गुंडाळली आहे
निघण्यासाठी.
निरवानिरव ?
नाही.
फक्त हा अस्ताव्यस्त पसारा थोडा आवरायला हवा.
(भाड्याचं घर सोडतानाही ते साफ करावं लागतं ना ?)
—हा पसारा अवघ्या आयुष्याचा :
तो आवरण्यातच हे अखेरचे क्षणही निसटणार आहेत का ?

## या साऱ्यांसाठी

तू माझं पत्र वाचशील तेव्हा
मला तुझ्या डोळ्यांत उतरता येईल का ?
सुकलेल्या आसवांसारख्या या पुसटत्या अधोरेखा,
वाऱ्याच्या वावटळीसारखे अक्षरांचे गरगरते भोवरे,
टिंबाटिंबातून टपटपलेली घायाळ प्रीतीची मुकी बोली,
कोपऱ्यातल्या समाधीसारखी घुसमटलेली बापुडवाणी सही...
तू माझं पत्र वाचशील तेव्हा
मला तुझ्या डोळ्यांत उतरावंसं वाटतं
या साऱ्यांसाठी.

## हे मला आज सांगू नकोस

खिडकीच्या टिचभर झरोक्यातून आभाळाचा तुकडा दिसला
आणि पाण्याच्या इवल्याशा थेंबात आभाळ मावल्यासारखं वाटलं,
तरी या सगळ्याहून ते मोठं असतं,
हे कळत का नाही ?
चार सोनेरी क्षणांच्या बिंदुकल्यात आभाळ तटतटलेलं पाहिलं तरी
पापण्यांची कवाडं खोलून ते कवळण्यासाठी अष्टांगांचे बाहू झाले
तर दोष कुणाचा ?
—आभाळ कवेत मावणार नाही हे मला आज सांगू नकोस.

## माझी वाणी मुकी झाली तेव्हा

माझी वाणी मुकी झाली तेव्हा तू बोलक्या मनानं हळहळलास,
खंतावलास.
अपेशी अहंकारानं आतआत दुखावलास.
—गाताना तुझा स्वरही अवघडून गेला, उगीचच.
तुला वाटलं,
'तिळा उघड' म्हटल्यावर सारं भांडार बघता बघता खुलं व्हावं
तशी प्रीतीच्या मंत्राक्षरांनी माझी गुहाही कळ दाबल्यासारखी उघडावी,
कोंडलेली वाणी मोकळी व्हावी;
होय ना?
होय रे, सारं खरं. चुकलं एकच.
ते मंत्राक्षर फक्त प्रीतीचं नव्हतं,
ते होतं प्रीतीच्या पोटीच जन्मणाऱ्या जीवघेण्या वेदनेचं.
ते मंत्राक्षर आज पुरं झालं.
माझी शापित गुहा उघडली :
कोंडलेली वाणी सैरभैर झाली.
आता भय वाटतं,
या अंधारात तुला डोकावता येईल का?
हे उकळते कढ तुला ऐकवतील का?

## तू गेल्यावर

तळहातानं झाकला सूर्याचा उघडा डोळा
आणि पाहिलं आभाळ सुनं
निश्चल सुतकी निमूटवाणं
तू गेल्यावर.

## माझ्या निरभ्र देहावर

काळाचे ओरखडेही मी चुकवले असते,
नव्हे,
ते ओरखडेही नसते.
दूधपित्या बाळाच्या रातंबी तळव्यांसारखे
काळाचे ठसेही अलगद उमटले असते
जीवनाशी कृतज्ञ राहिलेल्या
माझ्या निरभ्र देहावर.

## भरू म्हटलं म्हणून

शिगोशीग भरलेलं माप उलथूनच तुला या घरात यायचं होतं ना?
तुझा हा हट्ट मला समजलाच नव्हता असं तुला वाटलं?
पण भरू म्हटलं म्हणून कुठलंच माप भरता येत नाही
या मातीच्या हातांनी.
सुखाचं आणि वेदनेचंही.
माप कितीदा भरलं, भरून उतू गेलं;
तुझ्या पावलांसाठी मात्र ते कधीच पुरतं भरलं नव्हतं.
सुखाच्या आणि वेदनेच्याही काठांवरून हे डोळे जेव्हा आत वळले
तेव्हाच तुझ्या डोळ्यांत ते पुरं भरलं ना?
—ते उलथून तू आज आत आली आहेस.
पुराच्या पाण्यासारखं हे वेदनातीत दुःखही आता
सर्वदूर पसरलं आहे.
माझा गाव पाण्याखाली विसावतो आहे.
पाखराच्या चोचीसारखे हे ओठ वर राहिलेत तोवर थांबू नकोस :
बोलत राहा...बोलत राहा.

## तू गेलास—नेहमीसाठी

अज्ञाताच्या तीरावरून येणारा तुझा स्वर ऐकण्यापूर्वीच
अंगावर काटा आला होता.
वाटत होतं,
तुला नेणाऱ्या काळनदीच्या त्या काळ्याकभिन्न पाण्यावर
तुझ्या स्वरानं एक पूल बांधला जाईल :
त्या पुलावरून तू दोन पावलं पुढं येशील;
मीही येईन.
—हार्डबोर्डवरच्या फटफटीत कागदावर तुझी हसरी प्रतिमा टाचली होती
मेलेल्या फुलपाखरासारखी.
या हास्यानंच कधीकाळी काळजाचे ठोके चुकवले होते ना ?
टेप सुरू झाली.
तबकडी फिरू लागली.
बधिरलेल्या मस्तकातही एक तबकडी फिरत राहिली, गोलगोल :
अंधारात चाचपडणाऱ्या आंधळ्या पाखरासारखी.
तू बोलत होतास.
पडून गेलेल्या पावसाच्या पागोळ्यांसारखे तुझे शब्द टपटपत होते,
निर्जीव, मेलेले.
तो स्वर, ते हास्य सारंच मेलेलं होतं.
त्यांनी मला सांगितल :
काळनदीच्या या काळ्या पाण्यावर
कोणताच पूल कधीच बांधला जाणार नाही.
तू गेलास—नेहमीसाठी.
त्या मरणानं तू मेला नव्हतास, तसा या क्षणी गेलास माझ्यासाठी.
डोळ्यांतली आसवंही आज मेली आहेत.

## कधीकधी

कधीकधी मला तुझी कीव येते
—फक्त कीव येते.
तुझ्या नाकर्त्या हातांनी त्या उमलत्या आयुष्यावर असे वार केले :
त्या घायाळ त्वचेचंच बडलेलं हे पोलादी कवच मात्र
तुला दिसलं नाही.
कीव येते,
ते वार करणारे हातही तुझे नव्हते.
माझं जखमी मन मात्र फक्त माझं होतं,
माझंच राहिलं.

## तो अज्ञात प्रदेश मीच आहे

कोणत्या अज्ञात प्रदेशातून हे सैरभैर वारं झेपावत, सोसाटत येत आहे ?
...दाही दिशांनी...
माझ्यासाठी...फक्त माझ्यासाठी.
कोणत्या फुलांचे, ओल्या गवताचे, करपल्या मातीचे गंध
त्यांनी आपल्या पंखांवरून आणले आहेत ?
नाही, हे गंध ते नाहीत.
या गंधांना नाव नाही.
त्या अज्ञात प्रदेशालाही नाव नाही.
निदान मला ते माहीत नाही.
आणि तरीही हे सैरभैर वारं
दाही दिशांनी झेपावत आहे—माझ्यासाठी, फक्त माझ्यासाठी.
कारण...
कारण जो मीही अजून पाहिला नाही
तो अज्ञात प्रदेश मीच आहे
—मीच आहे.

## आपल्याच ओठांचं हे गाऱ्हाणं

मस्तकात गरगरणारं हे पिसाट चक्र आता थांबणारच नाही का ?
मेंदूमधल्या अणूअणूचा हा जळजळता स्फोट कधी संपणारच नाही का ?
या मेलेल्या मेंदूत वांझोट्या इच्छांच्या मुंग्याच जेव्हा सरपटत होत्या
तेव्हा या पिसाट चक्राचाच ध्यास घेतला होता ना ?
आता ते अनावर झालं तर
आपल्याच ओठांचं हे गाऱ्हाणं कोणत्या वेशीवर टांगणार ?

## पौर्णिमा गेली तर जाऊ दे

पौर्णिमेचा आपला संकेत चुकला म्हणून एवढं वाईट वाटलं ?
पौर्णिमा गेली तर जाऊ दे—आभाळ तरी आपलंच आहे ना ?
आणि ते पिठासारखं चांदणं तुला कधीपासून आवडू लागलं ?
(पीठच पाहायचं तर घराघरातल्या डब्यांतून ते कमी का असतं ?)
पौर्णिमेचं चांदणं किती एकेरी, किती एकाकी :
निर्मनुष्य विजनात स्वतःलाच शोधणाऱ्या पहिल्या दृष्टिहीन जीवासारखं.
ना नक्षत्रांची संगत.
ना अंधाराची प्रीत.
सावळ्या पाण्यांत कालवलेलं चांदणं,
अंधाराला बिलगलेलं चांदणं,
नक्षत्रांच्या डोळ्यांनी लुकलुकणारं चांदणं...
आणि एक विसरले :
त्या पिठासारख्या चांदण्यात डोळ्यांखालच्या या काळ्या छाया,
काळाचे हे ओरखडे कसे लपतील ?
म्हणून म्हणते,
हे सावळं चांदणंच अधिक आपलं आहे.

## तू येतेस

तू येतेस
आपली बेगुमान पावलं रोवीत, निधड्या छातीनं,
तेव्हा त्वचेच्या अणूअणूला डोळे फुटतात—सताड.
सारी लाज उघडी पडते;
सारी लाज झाकली जाते.
तू जातेस आपल्या बेदरकार गुर्मीत
पाठ देत अवघ्या आकांताला,
तेव्हा तुझ्या जात्या पावलांत गुंतलेलं काळीज
जातं फरपटत, रक्त सांडत.
त्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात तूच असतेस,
तूच असतेस.

## अजूनही सारं सोपं होईल

इवल्याशा कानांत फुंकर घालून, काजळतीट करून,
तुम्हांला पाळण्यात जोजवीत होते,
तेव्हा हुंगलेल्या त्या मऊ जावळाचा ओला गंध
मला आजही आठवतो.
—तुमच्या ओढीनं घराकडे धाव घेताना,
तटतटलेल्या स्तनांना धारा फुटत :
पदर भिजून जाई.
तुमचं बाळमुख झाकणाऱ्या त्या दूधभिजल्या पदराचा गंध
तुम्हांला आज आठवेल,
तर अजूनही सारं सोपं होईल.

## पाठ फिरवली तरी

उंबरठा ओलांडला तरी लळतलोंबत मागं येणारं हे घर :
डोळ्यांत प्राण आलेल्या केविलवाण्या कुत्र्यासारखं पायांत अडमडणारं,
शिवी हासडतानाही चुकचुकायला लावणारं...
कोण म्हणतं घर केविलवाणं
घर असतं बळकट, भक्कम,
मातीत रोवलेलं,
भिंतींनी तोललेलं,
वादळवाऱ्याशी झुंजलेलं, सोशीक.
सोशीक ?
घर असतं मुर्दाड, मख्ख,
अवघ्या आयुष्याच दान वसूल करणारं,
रक्ताच्या प्रत्येक थेंबाची किंमत घेणारं,
मांसाचा लचका मागणाऱ्या शायलॉकसारखं.
चार भिंतींच्या आडोशाला एकदा तीन दगड मांडले
की मानगुटीला बसणारं हे घर केविलवाणं ?
की पाठ फिरवली तरी पाठीला फुटणारे हे डोळे केविलवाणे ?

## पाण्यामधलं माझं हे घर ✓

गर्द गहिऱ्या पाण्यामधलं माझं हे बेट तुम्ही पाहिलं नाही का ?
तसा मलाही त्याचा कानाकोपरा अजून धुंडायचाच आहे.
नुकतंच तर गलबत या बंदरात नांगरलं आहे ना ?
नाही, कोणत्याच वादळी लाटा या बेटावर आता धडकत नाहीत.
प्रत्येक लाट येण्यापूर्वीच मला ती दिसते
आणि किनाऱ्याला शिवताशिवताच तिचं गोजिरवाणं बछडं होतं.
एका प्रलयंकारी लाटेच्याच पोटातून एक दिवस हे बेट वर आलं ना !
म्हणूनच पाण्यामधलं माझं हे घर आता पाण्यातही तरंगत नाही.

## चला, उशीर होईल निघायला

"हो हो, सांगतेय ना मघापासून
सारं आवरलं म्हणून ?
एवढं काजळकुंकू पर्समधे टाकलं की निघायचंच.
तुमचं दाढीचं सामान घेतलंत का ?
विसराळू आहात मुलखाचे आणि वर कांगावा :
मला आठवण का केली नाहीस ?"
"खोली किती मोकळीमोकळी झालेय नाही ?"
"कशानं राहातेय मोकळी ?
आपली पाठ वळते न वळते तोच टपकतील कुणी उपरी."
"पण जीव जडला ग दोन दिवसांत!"
"पुरे पुरे, कुणी ऐकलं तर खरंबिरं वाटायचं.
आणि एवढा मुळुमुळू कधीपासून झाला स्वारीचा जीव ?"
"चला, निघायला हवं आता, झालीच वेळ गाडीची.
काय खुडबुडते आहेस तिथं कोपऱ्यात ?
कसला वास ? उदबत्ती ? कुणी लावली या...या आपल्या
बेडजवळच्या खिडकीत ?
आणि...आणि हे पाणी ?"
"नाही हो, धूर गेला ना डोळ्यांत...
चला, उशीर होईल निघायला..."

## मी परत आले आहे

मी तशी दूर कधी गेलेच नव्हते
आणि जाणारही नाही.
पण तुला तसं वाटलं असेल ना ?
तर एकच सांगते,
दोघांच्या वाटची मी परत आले आहे.

## या निरर्थक नाटकावर

प्रीतीच्या स्पर्शानं अवघं अस्तित्व उजळल्यासारखं वाटतं
तेव्हाच खरा तर त्या निरर्थक नाटकावर अखेरचा पडदा पडतो
—नाटक सुरू राहिलं तरीही.
एक उजळलेलं जीवन दुसऱ्या उजळत्या जीवाला हाकारीत राहातं :
हाक पोचण्यापूर्वीच विरून जाते.
अफाट पाण्यात तरंगणाऱ्या दोन बेटांना स्पर्शाची पालवी फुटता फुटताच
अज्ञातातून लाट झेपावत येते
आणि सारंच अधांतर बुडून जातं.
अस्तित्वाच्या अर्थशून्यतेला छेद देणारी प्रीतीही किती केविलवाणी!
अस्तित्वाचा अर्थ त्याला जन्मतःच नाकारलेला आहे
हे तिलाही माहीत नसतं.

## तरच माझ्यातली ही शापित द्रौपदी

आज डोळे आत वळले आहेत
माझ्यातच लपलेल्या तुला शोधत.
आणि प्राण कानांत खिळले आहेत
तुझ्या पावलांची चाहूल घेत.
भरसभेत खेचून आणलेल्या मुक्तकेशा द्रौपदीसारखी
आज तुला या काळजातून उपसता आली तर,
तुझी नग्न कांती झाकणारं एकेक उपरं वस्त्र
या काटेरी हातांनी ओरबाडता आलं तर,
तरच माझ्यातली ही शापित, वंचित द्रौपदी
आता शांत होणार आहे.

## पिकत निवत गेलेल्या उन्हासारखी

इवल्याशा खुराड्यात कशी उलटतात ही वर्षे सुखासमाधानानं...
पिकत, निवत गेलेल्या उन्हासारखी.
कानशिलांपाशी पांढुरक्या झालेल्या त्याच्या केसांतून
आपली खरखरीत बोटं फिरवताना कुणालातरी मायेचं भरतं येतं.
त्या डोळ्यांपुढं अजूनही नाचत असतात ती बंडखोर झुलपं, तेव्हाची.
तिच्या कौतुकभरल्या डोळ्यांत पाहताना त्यालाही पुन्हा एकदा
आईसमोर छाती पुढं काढून मॅचला निघाल्यासारखं वाटू लागतं.
—जेवणाचं फोल्डिंग टेबल (हप्त्यांनी घेतलेलं) रात्री मिटवून टाकलं
की तिथंच शय्याघर थाटतं.
तिच्या दुखऱ्या पोटऱ्यांवरून आपली कारकुनी बोटं फिरवताना
कुणीतरी मऊसूत आवाजात विचारतं,
"दमलीस ?"
आणि खिडकीपाशी थबकलेला भागलेला चांदोबा
उगीचच सुखावून जातो.

## तुझं आईपण

तुझ्या दुखऱ्या कपाळावरून माझी कोवळी बोटं कधी फिरली होती का ?
तुझ्या अनिद्र रात्रीचे हुंकार माझ्या स्वप्नांनी कधी ऐकले होते का ?
आठवत नाही. इतकं पाणी पुलाखालून वाहून गेलं—
पूलही राहिला नाही, फक्त पाणीच राहिलं.
त्या पाण्यातही दिसतात तुझे काळेभोर विशाल डोळे
आणि त्यांत साकळलेली सोशीक वेदना.
ती वेदना दिसण्यासाठीही तुझं आईपण माझ्याकडे यावं लागलं.

## पायांतलं बळ बघता बघता ओसरून गेलं

गर्वानं पेटलेल्या मग्रूर मर्दासारखं दैव पुढं आलं असतं,
समोरासमोर ठाकलेल्या तुल्यबळ वीरासारखं ते आव्हान देत असतं,
तर मनगटाचं म्यान उपसून रक्ताच्या प्रत्येक थेंबाथेंबाची
एक सेना उभारली असती.
जीवनाचं हे अखेरचं समर प्राणपणानं जिंकलंही असतं.
पण धूसर अंधारात दैव पुढं आलं
या भळभळत्या वांझ दुःखाचं रूप घेऊन.
आपल्याच पायांवर डगमगणारं त्याचं दीनवाणं अस्तित्व डोळ्यांनी पाहिलंही नाही;
फक्त एक असहाय आक्रंदन कानांत घुमत राहिलं
आणि पायांतलं बळ बघता बघता ओसरून गेलं.

## जे करावंसं वाटतं तेही

तू वाचतोस त्या कागदावरची ही शाई रक्ताची शाई आहे
असं म्हटलं तर ते फार नाटकी वाटेल का ?
खरं तर ते कुणीतरी आधीच म्हणून टाकलेलं आहे.
—हीच तर आफत असते.
जे म्हणावंसं वाटतं ते कुणीतरी आधीच म्हटलेलं असतं
आणि जे करावंसं वाटतं
तेही कितीकांनी आधीच करून टाकलेलं असतं :
प्रेम, त्याग, समर्पण, खून आणि आत्महत्याही.
काय म्हटलंस तू ?
ही रक्ताची शाई खरं तर लालभडक दिसायला हवी.
तेच तर सांगत होते :
ही शाई अशी काळीजांभळी दिसते,
कारण हे रक्तच साकळलेलं आहे,
जळालेलं आहे.

## हे अवघं माथं

हे अवघं माथं : वेदनेचं भणभणतं मोहळ.
स्वतःलाच दंश करणाऱ्या वखवखल्या माश्यांनी बुजबुजलेलं.
या मोहळातलं प्रत्येक घर : वेदनेची एक जळजळती जीभ;
उकळतं, वितळतं मेण.
लवलवत्या जिभांतून धुमसला हा पिसाट वणवा
मज्जातंतूंच्या निबिड रानातून भडकलेला.
पापण्यांच्या ढाली नसत्या तर डोळेही बेचिराख झाले असते.
या धुमसत्या वणव्याचा धूर रात्रीच्या सताड डोळ्यांत घुसतो,
प्रत्येक क्षण तिच्या माथ्यावर न पडणाऱ्या थेंबासारखा साकळून राहतो,
तेव्हा वेदनेलाच द्रव फुटतो.
थेंबाथेंबानं ती ठिबकत राहते
आणि काळझोपेचं थारोळं हळूहळू साचू लागतं.

## निद्रेची अफीम

निद्रेची अफीम जीवावर चढते आहे...
जडशीळ झालेल्या पापण्यांच्या पखाली उचलता उचलत नाहीत;
पिसाटून उडणारी जाणिवेची नाडीही अर्धमेल्या ग्लानीत पेंगुळली आहे;
अजगरासमोर खिळलेल्या भक्ष्यासारखे डोळे सताड उघडे राहिले
वेदनेच्या पोटात जाताना,
हाडांचा चुराडा होतानाही ती हाडं आपलीच आहेत
हेही क्षणभर समजलंच नाही...
—कालच्या खारट अश्रूंत आजच्या सुखाचं गोडं पाणी मिसळतं आहे
आणि उद्याच्या स्वप्नांचं मचूळ रक्त क्षितिजावर अजून सांडलेलं नाही.
निद्रेची अफीम जीवावर चढते आहे...

## या भिंतीच म्हणून राहिल्या आहेत

एक पुरुष हवा आहे,
या घराला एक आडदांड पुरुष हवा आहे.
बटनं सापडत नाहीत म्हणून आरडाओरडा करून
घर डोक्यावर घेणारा,
आमटीला फोडणी खमंग पडली म्हणून खुशाळून जाणारा,
केसांतून बोटं फिरवली की वाळ होऊन कुशीत घुसणारा,
दमदार पावलांनी तिन्हीसांजेचा केविलवाणा अंधार उधळून लावणारा...
पुरुष हवा आहे या घराला,
एक आडदांड पुरुष हवा आहे.
नाही,
हे मी म्हणत नाही.
या भिंतीच म्हणून राहिल्या आहेत केव्हापासून.

## तुमचे हे सोज्वळ संसार

तुमचे हे सोज्वळ संसार एका फुंकरीनं उधळून लावावेसे वाटतात
पत्त्यांच्या बंगल्यासारखे.
कड्याच्या टोकाशी जाऊन दुप्पट वेगानं माघार घेणारे
तुमचे हे पळपुटे क्रायसिस,
मैथुनाच्या न येणाऱ्या नशेत बुडणारी तुमची केविलवाणी वादळं
आणि माणसाच्या मादीनं उब्रवलेली असहाय अर्भकांची गोजिरवाणी वीण
—ही वीणच तुमच्या चिकट संसाराची मुळं चिवट मातीत
खोलवर रुजवते
आणि हे पत्त्यांचे बंगले दगडी इमले होतात
माथी आपटून रक्तबंबाळ करण्यासाठी.

## अंधार

अंधार,
काळाकाळा अंधार.
आतबाहेर भरून राहिलेल्या, न सापडणाऱ्या देवासारखा अंधार.
विश्वानं आपल्या जन्मवेळी पाहिलेला, रामप्रहरीचा ताजा ओला अंधार.
न विटाळलेल्या कौमार्याचा कोवळा, अनाघ्रात अंधार.
संज्ञेची नाडी निसटता निसटता आईच्या हातानं सर्वांग माखणारा
मृत्यूचा अंधार.
अंधार,
काळाकाळा अंधार.

## सुख बोलत नाही

सुख बोलत नाही;
ते कणाकणातून फक्त झिरपत राहतं
कडेकपारीतून ठिबकणाऱ्या सहस्रधारेसारखं.
फेसाळत्या दुधासारखं ते जिवणीच्या कडेकडेनं सांडत असतं.
तीराला बिलगणाऱ्या फेसासारखं ते नाचऱ्या डोळ्यांतून खेळत असतं.
सुख बोलत नाही;
बोलू शकतही नाही.
आभाळाला ओढून घेणाऱ्या सरोवरासारखं
ते जीवाला स्वतःत ओढून घेतं, लपेटून घेतं.
—निरोपाच्या थरथरत्या क्षणी बोलू पाहतं ते सुखच असतं.
तेव्हाही त्याची भाषा असते हुंकाराची, खुणेची,
डोळ्यांत साकळलेल्या आसवांची.
सुख बोलत नाही;
बोलू शकतही नाही.
ते असतं...फक्त असतं.

## या शब्दांचं हे तीव्र रसायन

या शब्दांचं हे तीव्र रसायन तुम्हांलाही चढलं तर!
ताज्या जखमेसारखा हा ओला दर्प तुमच्याही मस्तकात भिनला ना?
"वा! काय शब्द पडले आहेत!
नेमके, उत्कट, अनुभवाच्या जिव्हारी भिडणारे!"
वाऱ्यावरून तुमचे उद्‌गार माझ्या कानांवर येतात तेव्हा
मृत्यूच्या प्रवाहात अलगद धारेला लागलेल्या ऑफीलियाकडे पाहून
म्हणावे, "वा! काय सुंदर मरते आहे!"
तसे एक धारदार पाते लकून चाटून जाते.

## मी विचारलं

"दमलेभागले तर तुला हाक घालीन, येशील ना?"
मी विचारलं.
तू मान हलवलीस, "मी इथंच आहे. जा, खुशाल जा."
अथांग पाण्याच्या कुशीत शिरता शिरता मागं वळून पाहिलं :
तुझे डोळे माझ्यावर खिळले होते.
त्या डोळ्यांची केवढी सोबत वाटली!
त्या सोबतीनं आभाळातल्या पाखरासारखे बाहू पसरले.
लडिवाळ पाण्यातली एक सोनेरी मासोळी झाले.
—न संपणारं पाणी श्रमलेल्या बाहूंनी कापता कापता
एकाएकी हात लुळेखुळे झाले, पांगळले, गळून पडले.
फेसाळतं पाणी कानाशी मरणघडीची कुजबूज करू लागलं.
जीवाच्या आकांतानं घातलेली हाक कंठातच गुदमरून गेली.
श्वासाचा लटपटता धागा हातातून सुटता सुटताच किनाऱ्याकडे पाहिलं :
तू जागचा हलला नव्हतास.
फक्त तुझे डोळे मिटलेले होते.

## तो जिताजागता कप्तान

बुडणाऱ्या बोटीच्या उंच टोकाशी आपल्या आसनावर
निश्चल बसलेला तो जिताजागता कप्तान डोळ्यांपुढून हलत नाही.
ती न पाहिलेली प्रतिमा आज चित्तावर कोरली आहे
वादळी रेषांनी.
दहा जणांच्या नांदत्या परिवारातला तोही एक कुटुंबवत्सल गृहस्थ असेल.
खानदानी बुरखा माथ्यावरून मागं झुकला म्हणून कधीकाळी चार जहरी शब्द
त्यानं तिला सुनावलेही असतील.
न मिळालेल्या बढतीचं किल्मिष त्याच्याही चित्तात खदखदलं असेल.
आपल्या रुग्ण पुत्राच्या उशापायथ्याशी बसून
त्यानंही मुकी आसवं ढाळली असतील.
पण आज—
आज मृत्यूच्या हलत्या बुबुळांशी आपले निश्चल नेत्र भिडवून
त्यानं उभ्या जन्माचंच नव्हे, अवघ्या माणूसपणाचं सोनं केलं.
त्याला पोटाशी घेताना सागरालाही आईपण आलं.
आयुष्याच्या बुडत्या जहाजावर धीरानं उभ्या राहिलेल्या
किती जीवांची मानवंदना आज त्या सागरतळाशी घुटमळत असेल,
कुणी सांगावं ?

## अपरात्री

या अंधारलिपीची ही जळजळती अक्षरं तुलाही वाचता आली असती तर
—तर माझे डोळे पापण्यांच्या पालखीत सुखानं झोपी गेले असते.
पण अंधारातल्या प्रश्नांची न मिळणारी उत्तरं शोधणारा तू नव्हेस.
म्हणूनच माझे डोळे सताड उघडे राहतात
या अंधारलिपीची मंत्रमूढ अक्षरं जुळवीत
अपरात्री.

## दुःखाला इलाज नसतो

दुःखाला इलाज नसतो.
दुःखाचाही इलाज नसतो.
तर्कविवेकाची लक्तरं ओरबाडून कधीकधी त्यालाही
उघडंनागडं व्हावंसं वाटतं.
दुःखाचाच देह;
दुःखाचंच ऊन.
सहानुभूतीचे तुरट डोस त्याला पाजलेत तर
उलटणाऱ्या बाणांसारखे ते तुम्हांलाच घायाळ करतात.
ती चैन कंगाल दुःखाला परवडत नाही.
—दुःख श्रीमंतही असतं.
त्याची श्रीमंती सुखाचा मुखडाही फटफटीत करते.
बेबंद उन्मादात स्वतःच उभारलेल्या विश्वाची
ते शकलं शकलं करीत राहतं,
तेव्हा केविलवाणं सुख कोपऱ्यात दडी मारून बसतं
आणि मग उरी फुटलेल्या दुःखाला जवळ घेण्यासाठी
तेच हळूच पुढं येतं.
दुःखाचा इलाज नसतो.
दुःखालाही इलाज नसतो.

## हे चांदणं

हे चांदणं माझ्या अंगावर येतं आहे :
आपल्या भगभगीत प्रकाशात ते मला उघडं पाडतं आहे.
त्याला नाही दयामाया;
त्याची नाही सावळी छाया.
गर्वानं पेटलेल्या विजयी वीरासारखं ते मेलेल्याला मारतं आहे...
हे चांदणं माझ्या अंगावर येतं आहे.

## ती

कोपऱ्यावरच्या वळणापाशीच ती उभी असते, वाट पाहत.
कुणी म्हणतं, झुडुपातल्या श्वापदासारखी ती दबा धरून बसलेली असते.
मला नाही तसं वाटत.
ती वाट पाहते आहे हे मला नेहमीच ठाऊक असतं.
चार पावलं आगंमागं, एवढंच.
एरव्ही सारीच वाटचाल या जीवसखीचा हात हातात घेऊनच
करायची असते.
कुणीकुणी तिला वेदनाही म्हणतात.

## स्पर्श

हलत्या बसच्या भोज्याला धावतपळत शिवले
आणि तारुण्याच्या उसन्या अवसानात आत झेप घेतली.
कंडक्टरची चरफडती नजर चुकवीत कोपऱ्यातली सीट गाठली.
मान मागं लोटून सुटकेचा निःश्वास सोडला.
—कुणीतरी शेजारी येऊन बसलं.
सुसाट धावणाऱ्या बसचे बेफाम धक्के सावरलेल्या देहांना बसत होते.
उनी कोटातल्या कणखर बाहूचा चुकतमाकत स्पर्श
झिरझिरीत वस्त्रात लपेटलेल्या दंडाला होत होता.
नकळता अंग सैलावलं.
एकदम दचकायला झालं.
बस पुरती थांबण्याआधीच एका तिरीमिरीत खाली उडी घेतली.
चुकचुकत्या पालीसारखं मन टकटकत राहिलं.
त्या पुरुषी बाहूचा अनोखा स्पर्श आज नकोसा वाटला नाही !

# माझ्या अनिद्र रात्रीचे हुंकार

माझ्या अनिद्र रात्रीचे हुंकार तुझ्या स्वप्नस्थ निद्रेला बिलगू पाहतात
तेव्हा त्यांना दूर सारून एक वेडं भूत तुझ्यामाझ्यामध्ये येऊन
खदखदा हसू लागतं.
तुझ्या छातीवरच्या हातांच्या चौकटीत चढून ते मला वाकुल्या दाखवतं.
म्हणतं, "या चौकटीत तुलाही येता येणार नाही.
तुलाही त्यानं या चौकटीबाहेरच ठेवलं आहे. राहा, बाहेरच राहा."
सारी शक्ती एकवटून मी त्याला दूर लोटते
तेव्हा ते माझ्याच माथ्यावर चढून बसतं.
आपली बगासारखी बोटं एका तालात आपटीत म्हणू लागतं,
"हा एक दिवस, तुझ्या आयुष्यातून निसटून जाणारा, पिकल्या फळासारखा
तुला नासवीत जाणारा आणखी एक दिवस...आणखी एक दिवस..."
मस्तक झिंजाडीत मी त्याला उलथून टाकते
आणि आवेगानं तुला बिलगू पाहते
तेव्हा तुझ्या छातीवरच्या हातांची ती बंदिस्त चौकट
तुरुंगाच्या गजांसारखी मला अडवून धरते.
कधी तीच दाराबाहेर काढलेल्या स्वस्तिकासारखी होते
आणि ते ओलांडून जायला पाऊल धजत नाही.
मग तुझ्यामाझ्यामध्ये निपचीत पडलेल्या त्या वेड्या भुतालाच
मी उचलून धरते, जवळ घेते.
—तुझ्यावाचून उलटणारं ते माझंच एकाकी आयुष्य असतं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
कॉव्य 22844
8492
संदर्भ शाखा (स्थळ

## प्रेमी मन

प्रेमी मन किती हतबल असतं !
हुडहुडणारं मूल ओल्याचिंबं अंगाची जुडी करून आईपुढं उभं राहतं
तसं ते आपल्याच प्रेमापुढं उभं असतं.
स्वतःला घायाळ करणारी सारी आयुधं त्यानं स्वतःच
दुसऱ्या कुणाला देऊन टाकलेली असतात.
शमीवृक्षानं राखलेल्या पांडवांच्या आयुधांसारखी ही आयुधंही
स्वतःपाशी सांभाळायची असतात,
चालवायची नसतात.
कधीकधी ते कळतही नाही.
कळतं तेव्हा फार उशीर होतो.

## दोष नाही तुझा

दोष नाही तुझा.
दोष नाही माझा.
दोष नाही या अंगभरल्या रक्ताचा.
रक्ताला हवीच संगत, रक्ताची.
मातीत निजलेल्या बीजासारखं ते वाट पाहत असतं.
वाट पाहता पाहता रंध्रारंध्रातून फुटून वर उसळतं.
वणव्यातल्या पळसासारखं अंगांगावर उतूमातू लागतं.
उसळ्या मारू नकोस, उतूमातू नकोस
असं त्याच्या जन्मदात्यानंही त्याला कधी सांगितलं नव्हतं.
तू सांगून आता ते ऐकणार नाही.

## उंटानं पाणी पिऊन घ्यावं

उंटानं पाणी पिऊन घ्यावं
तसं सुख भरून घ्यावं.
पोटात पाणी डुचमळावं;
सुख कंठात गुदमरावं.
अनवाणी पावलांनी
रेताड तुडवीत राहावं.
चालता चालता एक दिवस
गळयात आवंढा यावा,
पोटात खळगा पडावा,
सुक्या ओठांवर जीभ फिरवीत
कडवट घोट खोल गिळावा...
उंटानं पाणी पिऊन घ्यावं
तसं दुःख भरून घ्यावं;
भरता-सरता एक दिवस
रितं पात्र मागं उरावं.

## त्या अखेरच्या प्रलयाची

प्रलयकाळच्या मेघांसारखी ही काजळी छाया पसरते आहे सर्वदूर...सर्वदूर.
विराट पक्षिणीसारखं आभाळाचं छत झुकतं आहे खाली...खाली.
धरतीचा अर्धमेला जीव दडपतो आहे
येऊ घातलेल्या त्या अटळ ओझ्याखाली,
अंगाखांद्यावर खेळणाऱ्या आपल्या असहाय लेकरांसाठी.
आभाळाचं छत्रच काळछाया होऊन कोसळणार आहे
अवघ्या अस्तित्वावर, हे कळतं आहे फक्त तिलाच.
भारलेल्या सावजासारखी श्वास रोधून ती वाट पाहते आहे
त्या अखेरच्या प्रलयाची.

## शिंपला

समुद्राच्या कुशीमधला मी एक शिंपला
—एक मिटलेला शिंपला.
माझ्याच रसायनानं बंद केलीत माझ्या घराची दारं.
सारख्या सुरू असतात माझ्या अंगावरून
सागरी लाटांच्या येरझारा आणि त्यांची धून.
त्यांची खळबळ पोचत नाही माझ्यापर्यंत.
माझ्याच अंतर्यामीची थरथर मी ऐकत असते, कान देऊन.
या विस्तीर्ण जळराशीमध्ये मी तुम्हांला अगदी एकटी वाटते ना ?
माझी सोबत तुम्हांला दिसणार नाही.
ती माझ्यातच लपली आहे.
माझ्या प्रेमाचं हे अनघड मोती मी रात्रंदिवस उरीपोटी
वाढवते आहे.

## आईचे डोळे

कधीकधी एकटं वाटेल...
भरदुपारच्या एकांतात,
कातरवेळेच्या धूसर प्रकाशात
घराच्या भिंती अंगावर येतील...
गर्दीत सांडलेल्या अर्भकासारखं
मन सैरभैर होईल...
तेव्हा
तुझ्या पदराला एक लहानशी गाठ बांधशील ?
ती तुला सांगेल,
आईचे डोळे तुझ्याकडेच लागले आहेत.

## हे विसरणार नाहीस ना?

माझ्या अपेशी स्वप्नांची पाखरं
तुझ्या घरकुलाच्या वळचणीपाशीच आपलं घरटं करणार आहेत,
हे विसरणार नाहीस ना?
त्यांना चारापाणी देशील ना?
—दारापाशी डोळ्यांनीच घेतलेल्या हसऱ्या निरोपाचा,
मायपित्यांच्या कौतुकात न्हाऊन निघालेल्या
बाळजीवाच्या हुंकाराचा,
तृप्त शांतीचा?
स्वप्नांच्या यक्षनगरीतून निसटलेलं माझं घर
तुझ्या घरकुलातच मी आता पाहणार आहे
हे विसरणार नाहीस ना?

## झुळझुळत्या गवताच्या पात्यापात्यातून

झुळझुळत्या गवताच्या पात्यापात्यातून डोलते आहे
बालकवीची हिरवीगार कविता.
निळ्यासावळ्या झऱ्याच्या तुषारांत पाहते आहे आपलीच प्रतिमा
फुलराणी होऊन.
हिरवंगार काजळ माखलेले हे श्रांत डोळे भरभरून निवताहेत.
वेड्या जीवाच्या गंधकोषात मात्र दाटते आहे त्या घायाळ हृदयाची
गुंतागुंत. ऐकू येताहेत खोल भूमिगर्तेत खळाळणाऱ्या
अंधाराच्या शृंखला.
आणि धमन्याधमन्यांतून साकळतं आहे
मरणालाही गोड करणारं ते कोवळं रक्त.

## आता तरी

तू
माझ्या स्वप्नात कधीच आली नाहीस
हे जाणवलं, तेव्हाच फार उशीर झाला होता.
किती पुरांचं पाणी पुलाखालून वाहून गेलं होतं.
त्या काळ्याशार पाण्यात तुझी रुग्ण प्रतिमाही अंधुक,
अंधुक होत गेली...
न फेडलेल्या नवसासारखी तुझी आठवण
कधीकधी जीवाला हुरहूर लावी; इतकंच.
तुझं आईपण माझ्या पदरात आलं तेव्हा
पाण्यावर पडलेल्या प्रकाशलहरींसारखी
तुझी प्रतिमाही जागी झाली, बोलू लागली.
आज, माझ्या आईपणातलं हरपलेपण
अहेवपणीच्या वैधव्यासारखं माझ्या वाट्याला आलं
तेव्हा फक्त तुझ्याच आठवणीनं जीव गलबलून गेला.
किती तपांचं माप उलटून तुझी वेदनाही
माझ्या घरी वसतीला आली...
आता तरी माझ्या स्वप्नात येशील ना ?

## दूर आभाळरेषेपाशी

दूर आभाळरेषेपाशी झेपावलेला समुद्र
क्षितिजाच्या शोधात झपाटलेला;
हरपलेली सोबत तीरावरच्या माडांचीही
आणि किनाराही अंतरलेला :
माझ्या भविष्यासारखा.

## हा झाकोळलेला दिवस

हरवलेल्या चेहऱ्यासारखा हा झाकोळलेला दिवस येतो
रात्रीच्या उदरातून ढकललेल्या निश्चेतन गर्भासारखा.
त्याची नाळ अजून तुटायचीच असते.
आभाळाचीही होते एक विस्तीर्ण शवपेटी
आणि दिशांचे अश्रू झिरपत राहतात, निर्जीव सुरांसारखे.
कानावर येते फक्त
घरट्याघरट्यात जाग्या झालेल्या पाखरांची चिवचीव :
सुतकी घरात झुळझुळणाऱ्या बोबड्या बोलांसारखी.

## जगण्याचं पात्र

जगण्याचं पात्र कविता होऊन उतू जातं
तेव्हा ते उतू जाणाऱ्या दुधासारखं असतं :
काठाकाठानं अनावर ओसंडणारं,
फेसाळत्या धारांनी अलगद ओघळणारं.
क्वचित, फार क्वचित,
ते जिवणीच्या कडेनं निसटणाऱ्या स्मितासारखं असतं;
अभिषेकपात्रातून ठिबकणाऱ्या धारेसारखं असतं.
जगण्याचं पात्र कविता होऊन उतू जातं
तेव्हा ते उरी फुटलेल्या आभाळाच्या सहस्रधारेसारखं असतं.
आणि नेहमीच
मरणाच्या वेणा पार करीत जन्माचा सोहळा भोगणाऱ्या
आईपणासारखं असतं.

## लावण्याचं हे जीवघेणं रसायन

लावण्याचं हे जीवघेणं रसायन
गात्रागात्रातून कसं सरसरून भिनतं,
निखळ वेदनेनं कासावीस करतं,
—कुणा अभाग्यांना हे कधी कळलंच नसेल.
लख्ख धुतल्या क्षितिजावर ताज्या जखमेसारखा डवरलेला गुलमोहर,
कडुनिंबाच्या पोपटी पानांतून गाळून उतरलेली संधिप्रकाशाची केतकी धार,
तापलेल्या मातीच्या ओठातून फुटणारा गंधभारला हुंकार,
भरलेल्या आभाळाच्या प्राणांतून घुमणारा दीर्घदीर्घ ओंकार...
अष्टांगांचे बाहू पसरून,
गात्रागात्रांना ओठ फुटून,
किती पिऊन घ्यावं,
किती डसवून घ्यावं,
लावण्याचं हे जीवघेणं रसायन...

## आषाढातल्या आभाळाला

आषाढातल्या आभाळाला
फक्त आभाळच म्हणावंसं वाटतं.
गगनाची आणि नभाची गोजिरवाणी रुपडी
घरापुढल्या टिचभर अंगणासारखी वाटतात.
आभाळाचं भाळ असतं
देवगुरूच्या द्रष्ट्या ललाटप्रदेशासारखं.
अवघ्या मानवतेचं विधिलिखित
त्या विस्तीर्ण ललाटावर कोरलेलं असतं
नक्षत्रांच्या, विजांच्या आणि अंधाराच्या
अक्षरलिपीनं.

## आभाळ

आभाळ तसं स्वच्छ लख्ख असतं
तेव्हा ते देवाघरचं अंगण असतं.
पाखरांच्या किलबिलाटासारखं कोवळं ऊन आभाळ भरून सांडत असतं.
...ते नसतं तेव्हा आभाळ फक्त आभाळ असतं.
आभाळ असं मळभतं तेव्हा सारंच आभाळून जातं:
आभाळलेली हवा,
आभाळलेली माती,
आभाळलेला जीव.
मेघांच्या सापळ्यात अडकलेलं आभाळ, निसटता निसटता,
धरतीच्या कुशीत घुसू पाहतं, पोरक्या पोरासारखं,
तेव्हा मातीचा उपाशी जीव आभाळाहून मोठा होतो
आभाळाला कवळण्यासाठी.

## माझं हरपलेलं आईपण

आज घरी परतेन, तेव्हा तू नसशील.
तुझ्या इवल्याशा ओलसर मुठीत माझं रुखंसुकं बोट दिलं
तेव्हा आपल्या चिमण्या बोटांनी तू ते घट्टघट्ट पकडलंस.
तसं ते देताना मी स्वतःलाच तुझ्या बाळमुठीत निरवलं होतं
हे तुला कधी कळेल का ?
एक गोरागुब्रा उबदार हात गळ्यात टाकून कुशीत झोपताना
तुझ्या कळीदार ओठांतून स्मिताची एक इवलीशी धार ओघळून येई.
पाखराच्या चोचीसारखे आपले चिमणे डोळे वर उचलून तू माझ्याकडे पाहिलंस :
त्या बघण्यात माझ्या असण्याची केवढी विश्वासक खूण होती.
माझं हरपलेलं आईपण त्या डोळ्यांतच मला पुन्हा गवसलं होतं
हे तुला कधी कळेल का ?

## तुमची गाणी, तुमची विराणी

तुमची गाणी, तुमची विराणी मला आता ऐकू येत नाही
आणि कानावर आली तरी ती काळजात रिघत नाही.
सागरी शिंपल्याच्या पोटात ऐकू यावं
सागराचंच विस्तीर्ण संगीत,
तसं माझं अस्तित्व एकवटलं आहे आता माझ्या गीतांत.
त्या गीतांचीच धून घुमते आहे कानामनात.
सारं आयुष्य एक वाहती जखम झालं
तेव्हा
त्या भळभळत्या प्रवाहात माझं गीत वाहून गेलं
अपुऱ्या दिवसांच्या गर्भासारखं.
आज ते परत आलं
नवा जन्म घेऊन—अवघ्या अस्तित्वाचा अर्थ होऊन.
तुमची गाणी, तुमची विराणी मला आता ऐकू येत नाही.
जखमांना हार न जाणारं हे रक्त आता या गीतांमधून वाहतं आहे.

## ही उदासी

ही उदासी.
सुखाच्या मऊ उबदार पंजातून हलकेच नखं बाहेर काढणारी ही उदासी.
सुखाच्या चांदण्यात पांढुरक्या पालीसारखी दबकत, दबकत येणारी ही उदासी.
तृप्तीची लाट चढत चढत असतानाच
व्यंगी अर्भकासारखी तिच्याच पोटातून प्रसवणारी ही उदासी.
कासवाच्या पायांसारखं सारं अस्तित्वच आत ओढून घेणारी ही उदासी.
जीवनाचा हलता लंबक मृत्यूच्या टोकावर नेऊन खिळवणारी ही उदासी.
ही उदासी.

## या कडुनिंबाचा

या कडुनिंबाचा उवडावावडा खराटा पाहिला एक दिवस
काळा वर केलेल्या खंक संसाराच्या बेदरकार सांगाड्यासारखा.
त्या भकास दैन्यातही तो दीनवाणा वाटला नाही.
पोपटपानांची कोवळी कुरळी लव त्याच्या अंगांगावर विलसू लागली
तेव्हा आपल्या सहजस्मितानं ते बाळलेणं
तो केल्यासवरल्या देहावर सांभाळत होता.
भरगच्च शाखांच्या, हिरव्यागार पानांच्या संभारात
तो नांदत्या, भरल्या घरासारखा वाटला.
पिवळ्याधम्मक निंबोण्यांच्या वत्सल संसारात आज त्याला पाहिलं
आणि विस्मित झाले.
क्षितिजावर कलंडलेल्या केविलवाण्या चंद्राला
त्यानं आपल्या घरट्यात आसरा दिला होता.

## मुक्त व्हावं लागतं स्वतःलाच

तसं कुणालाच नाही, स्वतःशीच पुटपुटले, श्रमलेल्या आवाजात :
"आता मुक्त करा या काचातून मला. सहन होत नाही.
आणि पाठीवर जखडलेल्या या कुबड्या म्हाताऱ्यालाही ओढून काढा कुणीतरी."
अचानक कुणीसं उत्तरलं, गुहेतून बोलल्यासारखं :
"मुक्त करीत नाही कुणीच, कधीच. मुक्त व्हावं लागतं स्वतःलाच.
आणि पाठीवर चिकटलेल्या त्या कुबड्या म्हाताऱ्यालाही खेचून,
तोडून काढावं लागतं, अंगांग रक्ताळलं तरीही.
कारण पाठीवरच्या आवाळूसारखं
तेही एक अधू अंग आहे
तुझ्याच नासवल्या जीवाचं."

## तू—मी

सचैल न्हालेल्या ओतप्रोत धरतीसारखीच काठोकाठ ओसंडते आहे...
इवलंसं बोट लागलं तरी कलंडून वाहतें आहे...
मी तिच्याकडे,
ती माझ्याकडे.
बघता बघता हास्याचे अवखळते झरे निसटून धावताहेत कडेकपारीतून,
जिवणीच्या कडेतून.
आभाळातील सहस्रधारेनं पसवलेली माती मला विचारते आहे :
"कशानं ओथंबली आहेस अशी...
अशी मातलेल्या हिर्वळीसारखी,
दूधभरल्या मेघासारखी ?
लेकुरवाळ्या केळीसारखी ?"
"तुझ्यासारखी!"
मी हसून तिला उत्तरते.
रोमारोमातून पान्हावल्या तिचे हुंकार खोलखोल हुंगत राहते.

## आयुष्याच्या हमरस्त्यावर

पाय लांबवून आळस देणारा घोडा तुम्ही पाहिला आहे ?
काल त्याला पाहिलं
तेव्हा एका राजरस्त्याच्या मध्यभागी
तो बेदरकार उदासपणं उभा होता.
येती-जाती वाहनं त्याला खेटून विस्मयानं पुढं जात होती.
हमरस्त्याच्या मध्यभागी आखलेल्या शुभ्र रेषेवर तो उभाच होता.
माझं मनही कधीकधी असंच, आयुष्याच्या हमरस्त्यावर,
हट्टवादी बेपर्वाईनं उभं टाकतं.
तसं उभं राहण्यातला बेदरकार हट्ट कुणाला दिसतो;
आतलं अडेल कारुण्य मात्र कुणालाच दिसत नाही.

## त्या अखेरच्या मुक्तीचं रूप

युगानुयुगं क्षितिजाला पाठीशी घेतलेल्या हिमधवल
पर्वताचं अद्‌भुत डोळे भरून पाहिलं.
पाणावल्या डोळ्यांपुढं
न पाहिलेल्या स्वप्नासारखं तरळत राहिलं.
तपोधन ऋषिवर्यांच्या निखळ शांतीसारखी
काळ्याभोर पर्वतावर विसावलेली ती धवळाई
या लोकातली नव्हतीच.
तिला स्पर्श करायचाच तर
त्वचेला सोलून काढावं तशा
या मातीच्या देहाच्या वासना आणि वेदना सोलूनच
तिच्या जवळ जाता येईल.
कदाचित...
कदाचित
त्या अखेरच्या मुक्तीचं रूपही असंच असेल का ?

## तो आकाशातला धन्वंतरी

तो आकाशातला धन्वंतरी माझ्यावर इलाज करतो आहे.
एक जळजळीत रेघ माझ्या भाळावर त्यानंच कधीकाळी ओढून ठेवली.
त्या अज्ञातलिपीची अक्षरं वाचता वाचता उभा जन्म
कापरासारखा जळत राहिला.
—ती रेघ पुसून टाकणं आता त्यालाही शक्य नाही.
म्हणूनच काट्यानं काटा काढावा
तसा दुःखाला दुःखाचाच उतारा देऊन
तो माझ्यावर इलाज करतो आहे
—तो आकाशातला धन्वंतरी.

## ही मळभलेली हवा

ही मळभलेली हवा कवितेला बरी.
दाराच्या किलकिल्या फटीतून आत येता येतं फक्त तिलाच
आणि मान फिरवून पाठमोऱ्या झालेल्या अवघ्या अस्तित्वाला
सामोरी येते फक्त तीच.
तिच्या स्कंधावर माथं टेकवलं तरी विस्कटल्या केसांतून
तिची हळवी बोटं फिरत नाहीत;
मायेनं माखलेला हात पाठीवर थोपटत नाही;
डोळ्यांतून ओघळलेलं खारं पाणी तिला खारं पाणीच वाटतं :
ते पुसायला तिचा थंडगार हात पुढं होत नाही.
फक्त जाणवते, प्रत्येक क्षणाला जाणवते,
या देहात बंदिवान झालेली नाडी तिच्याच मनगटात उडते आहे
आणि या निश्चेतन हृदयाची धुगधुगी तिच्याच वक्षात स्पंदन पावते आहे.

## या शीतपेटीच्या पांढऱ्याशुभ्र कबरीत

या शीतपेटीच्या पांढऱ्याशुभ्र कबरीत अवघं अस्तित्व पुरून टाकलं तर...
या औरसचौरस चौकटीत हे चित्र मुडपून, छाटून जखडता आलं तर...
या बर्फगार निवाऱ्यात, तळावलेल्या भावना थंडावतील,
गारठतील,
कधीतरी गोठतीलही, नेहमीसाठी.
उकळत्या रक्ताचे रतीब या बर्फपात्रात रिचवले तर
त्याचे कापीव, घडीव ठोकळे तयार होतील.
वाहत्या रक्तप्रवाहाऐवजी हे अस्तित्व म्हणजे
एक ठोकळयांचं घर होईल
—एक चिरेबंदी, बर्फगार घर.
त्या घरात मला फक्त झोपी जायचं आहे.

## ती तूच असशील

चिवट जिवाणूसारखं सरपटत, स्वतःलाच ओढत, खेचत
मला जायलाच हवं.
माझ्या माथ्यावर ही रक्तखूण रेखून अदृश्य होणाऱ्या
तुझ्या जात्या पावलांमागं मला जीवाच्या आकांतानं जायलाच हवं.
तरच तू बोलू लागशील
हिरव्या विजनात,
रणरणत्या उन्हात,
सरत्या संधिप्रकाशात.
भर दुपारच्या तलखलीत खांद्यावरचं जडजड ओझं
एकाएकी हलकंफूल होईल.
कातरवेळेच्या अंधारात कुणाचे शीतल श्वास
अवचित मुखावर लहरू लागतील.
नीरव रात्रीच्या एकाकी शय्येवर कुणीतरी हलकेच साद घालील :
ये, जवळ ये. कुशीत ये.
तुला ठाऊक आहे?
ती तूच असशील...
तूच असशील.

## माझं हसू

माझं हसू रडण्याहून केविलवाणं होईल,
कुत्र्याच्या लाळेसारखं थेंबथेंब ओघळू लागेल,
तेव्हा वाट न पाहता मला बोलावून घे.
नितळ पाण्यानं वनश्रीला पोटाशी घ्यावं
तसं दुसऱ्याच्या सुखाचं बिंब माझे डोळे जेव्हा झेलणार नाहीत,
तेव्हा समज :
मला तुझ्यापाशी बोलावून घेण्याची वेळ जवळ आली आहे.

## सावली

सुखाच्या धारेत तू वाहत होतास
तेव्हा तीरावरच्या तापल्या वाळूत
मी शोधत होते
माझ्याच पायांत घुटमळणारी माझीच सावली.
शोधशोधूनही ती सापडेना
तेव्हा तळावलेले डोळे प्रयासानं वर उचलले
आणि पाहिलं,
सुखाच्या धारेत वाहत चाललेल्या तुझा फडफडता पदर
मुठीत घट्टघट्ट पकडून एक अंधुक आकृती तुझ्याच मागं
वाहत होती;
माझ्याचसारखी, पण मी नसलेली
ती माझीच सावली होती.

## 'नो प्रॉब्लेम'

हळुहळू रात्री उदबत्ती लावायचंही राहून गेलं
आणि लावलीच तरी तिचा गंध येईनासा झाला.
झपाझप पुढं जाताना मागं पाहायचंही तू विसरू लागलास
आणि कधी तुझ्याबरोबर चालतानाच चुकल्यासारखं वाटू लागलं.
रोखलेल्या शोधक डोळ्यांनी सभोवार पाहताना
तुझ्यापाशी असूनही मी तुझ्याजवळ नव्हते.
फक्त कानावर पडत
फेसाळत्या पेयाचे चषक रिचवीत
कुणाकुणाशी रंगून बोलणाऱ्या तुझे शब्द :
पाण्याबाहेर डोकं वर काढणाऱ्या सुसरीसारखे :
"नो प्रॉब्लेम!"

## देवाघरचं हेच सोलीव स्वप्न

हिमधवल गिरिशिखरांची ही अद्भुत स्वप्नमालिका
कोणत्या दिव्यलोकातून अलगद उतरलेली
क्षितिजाला पाठीशी घेऊन
चिरंतनाच्या स्वप्नात समाधिस्थ झालेली.
या दर्शनाला वाणी नाही.
या अद्भुताला सीमा नाही.
पापण्यांची कवाडं खोलून साठवून घेऊ दे
देवाघरचं हे असीम लाघव
आणि सफळ होऊ दे याच क्षणाला
गतजन्मांच्या ओंजळीतून अजूनही न हरपलेलं संचित.
कदाचित...कदाचित उद्याच्या वैराण वाटचालीत
अनवाणी डोळ्यांना करणार असेल सोबत
देवाघरचं हेच सोलीव स्वप्न.

## पहाटेच्या रामप्रहरी

पहाटेच्या रामप्रहरी त्या हरितनगरीचा निरोप घेतला तेव्हा
दूरदूरचे निळे पर्वत स्वप्नातल्या साक्षीदारासारखे उभे होते
आणि नाताळवृक्षांच्या पसरल्या बाहूंतून धुकं मंदमंद झिरपत होतं.
आभाळाचा वेध घेणाऱ्या वृक्षराजीच्या
प्रत्येक लवलवत्या पानात भरून राहिली होती
एक अनामिक थर्थर,
जी माझ्याही अंतर्यामी दाटली होती
पहाटेच्या रामप्रहरी
त्या हरितनगरीचा निरोप घेतला तेव्हा.

## सारीच वस्त्रं ओरबाडली

सारीच वस्त्रं ओरबाडली.
गतजन्माच्या महाकळेनं लोटत लोटत,
रक्ताच्या भळभळत्या प्रवाहात
तुझ्या पुढ्यात पडले, नवजात अर्भकासारखी,
तुझ्या प्रीतीचं एकच अभंग वस्त्र अंगभर ल्यावं म्हणून.
पण या मातीच्या देहाची उपरी वस्त्रउतरूनच भागलं नाही.
झाडाची साल सोलावी तशी या उघड्यानागड्या जीवाची
सारी त्वचा सोलून या नव्या जन्माला सामोरं यावं लागलं
तुझ्या स्पर्शासाठी.
त्या रक्तमाखल्या वेदना अजूनही शमल्या नव्हत्या.
तशीच घातली मिठी तुझ्या वीर्यशाली पौरुषाभोवती.
आणि तुझ्या स्वत्वाचं एकच अभंग कवच लाभलं
माझ्या अवघ्या अस्तित्वाला.

## हे अवलिये कलावंत

त्या बलदंड शिल्पाकडे मला हातानं ओढत,
भारलेल्या डोळ्यांनी एकटक पाहत
तू म्हणालास,
"बघ ना, हे अद्‌भुत घडवताना यानं मुलंमाणसं,
दिवसरात्र पाहिली नसेल.
हे अवलिये कलावंत आपल्या कलाकृतीशी जितके पेशंट
तितकेच जवळच्या माणसांशी इंपेशंट असतात, नाही?"
तझ्या खेचणाऱ्या हातांना लोंबकळत मी मनात म्हणाले,
"यू आर टेलिंग मी."

## एक अनोखं गीत

कमरेभोवती हात लपेटलेली किलबिलत्या पाखरांची एक जोडी
आत्ताच या झाडाखालून गेली.
त्या उसळत्या प्रणयगंधानं थरारलेलं हे झाड
पानापानातून सळसळतं आहे, अजूनही.
आपल्या वृद्ध आजोबांचं बोट धरून एक गोजिरवाणं बालकही
मघाशीच या झाडापाशी रेंगाळलं.
दोघांची पावलं याच मातीत उमटली :
या पोक्त्यापुरवत्या वृक्षानं तीही पाहिली
आणि वाऱ्याचे हात पसरून जवळ घेतली.
माझ्याही हरपल्या स्वप्नांची पाखरं उतरली आहेत
आज याच झाडावर
आणि किलबिलत आहेत या सळसळत्या पानांवर.
या उफाळत्या यौवनगंधानं फुलारले आहेत त्यांचे पंख
आणि पहाटेच्या चाहुलीसारखं
त्यांच्याही तहानेल्या चोचींतून फुटतं आहे
एक अनोखं गीत
अपार तृप्तीचं
नव्या जन्माचं.

## अंधारात गुरफटलेल्या

अंधारात गुरफटलेल्या डोंगरांच्या उतरणीवरून घरंगळलेल्या घरांचे लुकलुकते दिवे
न दिसणाऱ्या आभाळरेषेला छेद देता देताच एकाएकी विझलेले :
कवितेच्या अर्ध्यामुर्ध्या ओळीसारखे.
आणि पलीकडे
क्षितिजालाच पाठीशी घालणाऱ्या पर्वताचा प्रचंड धूसर काळाभोर विस्तार :
अंतर्यामी दाटलेल्या अथांग भावाशयासारखा.

# निरोप घेता घेता पाहिलं

निरोप घेता घेता पाहिलं,
पॅरिसचं आभाळ कसं स्वच्छ होतं.
सेनच्या पुलापाशी गाडी वळली तेव्हा
निळ्याशार आभाळात रुतलेला एफेलचा मनोरा निश्चल उभा होता
आणि नदीकाठच्या तजेल हिर्वळीवर ऊनसावल्यांचा खेळ
केव्हाच सुरू झाला होता.
नव्या नव्हाळीची पोपटपालवी पॅरिसच्या स्वच्छंद वाऱ्यात
स्वतःशीच झुळझुळत होती.
—जराशानं, सळसळती सोनेरी दुपार कलता कलता,
याच सेनच्या तीरावर येईल कुणी तरुण चित्रकार
ब्लू जीनवर चढवून एक रंगमाखला एप्रन
आणि अलवार बोटांनी उजळील रंगांची उमलती दुनिया.
सरत्या सांजेचा सूर्यही थबकेल त्याच्यासाठी आणि कुरवाळील
त्याच्या कोवळ्या मुखाला.
नदीकाठच्या उतरत्या पायऱ्यांवर अलगद उतरेल कुणा कबुतरांची
लडिवाळ जोडी : चोचीत चोच, पंखात पंख खुपसून फुलवील
प्रत्येक थरथरत्या क्षणाचा एक मोरपंखी पिसारा.
पलीकडे अवघ्या अदृष्ट भविष्यालाच आव्हान देत उभा ठाकेल
रोदांचा बाल्झाक
आपल्या मनस्वी प्रतिभेचं रोरावतं तुफान बलदंड उरामध्ये कोंडत.
आणि इकडे, सेनच्या तीराशीच, आभाळाला पाठीशी घेऊन उभं राहील
निरंतर नोत्रदामचं प्रार्थनामंदिर
सभोवतीच्या प्रमत्त यौवनावर घालीत येशूच्या अथांग करुणेची पाखर.
सेनच्या पुलापाशी पुन्हा एकदा गाडी वळली तेव्हा
नेपोलियनच्या नगरीचे ते झुंजार वारे छातीत भरभरून घेतले.

मागं वळून आर्च ऑफ ट्रायंफकडे डोळे भरून पाहिलं.
आणि रेन्हिकला मनोमन भेटून आले.
आत्मतंद्रीत बुडालेले आपले डोळे वर उचलून तो म्हणाला,
" उशीर केलास, पॅरिसचं आभाळ पाहायला फार उशीर केलास. "

## पंख पसरून झेपावू दे दूर

थांब. श्वास भरभरून घेऊ दे आज, आत्ताच.
यौवनगंधानं दर्वळलेल्या या ताज्या तरळ हवेत,
या कोंडलेल्या वक्षात.
आणि पंख पसरून झेपावू दे दूर तहानेल्या डोळ्यांना
या उजळलेल्या अवकाशात.
ही सळसळती पानं,
हे झुळझुळते वारे,
सारेच जीवनरसानं ओथंबून मला हाकारीत आहेत
आणि भिजलेली हाक रक्ताच्या कणाकणातून उफाळत आहे.
थांब, असा कातर होऊ नकोस.
जखमी झालं असलं तरी या पाखराचे पंख अजून तुटलेले नाहीत.
म्हणून म्हणते, उडू दे मला, झेपावू दे आत्ताच
या उजळ मोकळ्या अवकाशात
आणि श्वास भरभरून घेऊ दे यौवनगंधानं दर्वळलेल्या
या ताज्या तरळ हवेत.

## मिटून घेऊ दे डोळे

मिटून घेऊ दे डोळे.
पाहवत नाही आता या क्षीण डोळ्यांना
हिमाच्छादित नगाधिराजांचं हे लखलखतं ऐश्वर्य.
दृष्टीचं पारणं फिटलं
आणि डोळ्यांच्या बाहुल्याही विझू विझू झाल्या.
मूर्तिमंत शुभ्रतेलाही सोलून काढणारं हे लसलसतं लावण्य
किती कठोर, किती अदय भासतं आहे
त्या विश्वनियंत्या जगच्चालकाच्या न उमगणाऱ्या स्वरूपासारखं.

## ती धूळभरली, मरगळलेली वाट

डोळ्यांची पाखरं झेपावत गेली दूर दूर क्षितिजाच्या पल्याड
तर दिसेलही अंधुक स्वप्नासारखी
अँडीज पर्वतावर पसरलेली धवल हिमाची शाल
आणि इकडे, अलिकडे, पाटीवर काढलेल्या चित्रासारख्या डोंगरांच्या सुबक ओळी :
त्यांतून उफाळत येणाऱ्या नव्या दिवसाच्या ताज्या प्रकाशलहरी.
हिरव्यागार कुरणात विश्रब्ध चरणाऱ्या काळ्यापांढऱ्या मस्तवाल गाई
आणि उमद्या अश्वांच्या तजेलदार पाठी कोवळ्या उन्हात तकाकणाऱ्या.
हिरव्यागार झाडाचं पानपान तरारलेलं :
ऊनपाणी खाऊन जीवनरसानं ओथंबलेलं.
आणि लडिवाळ हिर्वळीशी खेळणाऱ्या अनुभवी झाडांच्या वत्सल सावल्या सर्वदूर.
डोळे भरून पाहता पाहता हे अथांग कौतुक
मधूनच डोकावते अशुभ स्वप्नासारखी
ती धूळभरली, मरगळलेली वाट
—एकटी, अगदी एकटी.

## ते हिरवेगार डोंगर

दूरदुरून जवळ झालेले ते हिरवेगार डोंगर
डोळ्यांपुढून हलत नाहीत.
तेही किती विश्रब्ध, किती तृप्त भासत होते :
स्वतःच्याच संवादात विरघळलेल्या कृतार्थ जीवासारखे.
माथ्याशी झुकलेल्या सावळ्या आभाळालाही संगत होती त्यांचीच
आयुष्यभराच्या अथांग सोबतीसारखी.
आणि दूरवरचं क्षितिजही उभं होतं त्यांच्याच आधारानं, त्यांच्याच पाठीशी.
त्यांच्या अंगांगावर पसरली होती मायेची, शांतीची हिरवी शाल
—नव्हे, त्यांच्या निवलेल्या जीवाची ती अंतःत्वचाच होती.

## त्यांची तजेल पावलं

त्यांची तजेल पावलं चढणीवर चढताहेत
एका तालात, एका लयीत.
त्यांच्या हिरवळलेल्या पावलांखाली आज काटेही दबले आहेत.
आणि "मला विसरू नकोस, विसरू नकोस" कुजबुजणारी निळी फुलं
रक्ताच्या कणाकणातून फुलली आहेत.
कमरेभोवती लपेटलेल्या त्याच्या बाहूत तिला गवसली आहे
साता जन्मांची सफल कहाणी
आणि तिच्या विश्वासक डोळ्यांत त्याला दिसते आहे
अज्ञात भविष्याच्या अवघ्या स्वप्नांचीच सांगता.
थांब, इथूनच पाहू दे मला डोळे भरून त्या स्वप्नवनाची
हिरवळलेली वळणं
आणि छातीत घेऊ दे भरून यौवनगंधानं सळसळणारे हे
अनोख्या नगरीचे वारे.
माझी पावलं केव्हाच उतरणीला लागली आहेत.

## या लखलखत्या दीपोत्सवात

या लखलखत्या दीपोत्सवात चंद्र कसा अनाथ आहे.
चांदणं कसं ते पाहिलंच नाही रे.
एकदा पाहिलं त्याला हिमधवल पर्वतावर पडता पडता स्वतःलाच सावरताना.
आणि एकदा अपरात्री, गगनचुंबी वृक्षांच्या भुतासारख्या
पसरल्या बाहूत अडकलेला :
कितीदा तरी अनवाणी पावलांनी वैराण वाट तुडविणाऱ्या
एकाकी पांथस्थासारखा.
नवलाख दीपांच्या या रोजच्याच दीपावलीत
चंद्र कसा पोरका पोरका झाला आहे.
त्याला जवळ घ्यायला आता आपल्याला आपल्या घरीच
जावं लागेल.

## उशामाथ्याशी प्रचंड पहाड

उशामाथ्याशी प्रचंड पहाड
काळाभोर, निश्चल, अचल :
अटळ प्राक्तनासारखा.
डोंगरमाथ्यावर पांढरंशुभ्र चर्च,
आभाळात रुतलेला निमुळता क्रॉस,
झुकलेलं आभाळ, असहाय : काळछायेसारखं.
चर्चच्या अदमुऱ्या प्रकाशात येशूची घायाळ मूर्ती धरतीवर ओघळलेली
आणि वर त्याच्याच माथ्यावर छतापाशी कुबड्या—होय, कुबड्या :
त्याच्याच अद्‌भुत लीलेनं हातीपायी सावरलेल्यांनी मागं ठेवलेल्या.
येशूला धरतीवर असं घायाळ कधी पाहिलं नव्हतं.
त्यालाही हवी असेल का एक कुबडी या रक्तमाखल्या मातीतून उठण्यासाठी ?

## तूही कसा तो भेटलाच नाहीस

पोट उकलून बोलावं असं किती दिवसांत
कुणी भेटलंच नाही.
रात्री, अपरात्री, हात लांबवून स्पर्श करावा
इतका जवळ तू होतास;
पण किती दिवस उलटले,
किती रात्री ओसरल्या...
जीवाचं मैत्र कसं अनाथ झालं...
सांगायचं होतं ते हेच
आणि तुलाच.
पण पोट उकलून सांगायला तूही कसा तो भेटलाच नाहीस.

## एकटेपण किती एकटं असतं

अखेर एकटेपण किती एकटं असतं
आजच्याइतकं हे कधीच कळलं नव्हतं.
फुलानं गंधकोषातून उधळून द्यावं सुगंधाचं सारं देणं वाऱ्यापाशी
आणि भरलेल्या ढगाचं मीपण शोषून घ्यावं मातीनं,
तेच फळून यावं तिच्या उदरातून, नव्या अंकुराचं बाळलेणं लेवून,
तसं
सारंच
तू मला
मी तुला
द्यायचं होतं ना!
पण आपल्या प्राक्तनाची ही लक्ष्मणरेषा
तुला ओलांडता आली नाही
आणि मलाही.

## ते मला आज कळतं आहे

पाचूहिरव्या विस्तीर्ण जलाशयाचं हे अथांग रूपलावण्य,
वितळत्या हरित रत्नांची ही लसलसती किमया,
डोळ्यांची पाखरं झेपावली क्षितिजापल्याड
तरी सरणार नाही ही जळवंतीची माया...
शेलेला आपलं मरण सागराच्या कुशीत का हवंसं वाटलं
ते मला आज कळतं आहे.

## आणि तरीही ती आपलीच असतील

या लुटूपुटीच्या घरकुलाची घटका भरत येईल ना,
तेव्हा त्या अखेरच्या दिवशीच जाऊ आपण
आपल्या घरासमोरच्या त्या हिरवळलेल्या टेकडीवर.
सळसळत्या वृक्षांच्या सावल्या तिथं रांगोळी घालताहेत
यौवनाच्या औक्षणासाठी.
आणि उत्फुल्ल तारुण्याचं कारंजं वळणावळणावर भिजवतं आहे
हिरव्यागार स्वप्नांचे सतेज गालिचे.
तिथंच, एखाद्या वेलीच्या मांडीवर जागी होत असेल
स्वप्नांच्या धुक्यात किलकिल्या डोळ्यांनी बघणारी फुलराणीही.
कदाचित...कदाचित हातात हात गुंफून, भेगाळलेल्या पावलांना उभारी देत,
आपणही वर चढलो त्या हिर्वळलेल्या स्वप्नभूमीत
तर एखाद्या वत्सल वृक्षाच्या निवाऱ्याला भेटतीलही कदाचित
गतजन्माच्या वळणावर अनाथ झालेली आपलीच पोरकी अश्राप स्वप्नं.
शिणलेले बाहू पसरून हलकेच घेऊ या त्यांना वक्षाशी.
वाट पाहता पाहता तीही आता मालवली असतील
आणि तरीही ती आपलीच असतील.

## दुःख

दुःख तुला कधी उमजलंच नाही;
दुःख तुला कधी भावलंच नाही.
तळहातावरच्या हळव्या प्राजक्तासारखं
दुःखाला तू कधी जवळ केलंच नाहीस.
त्याच्या खोल तळात तुझं अस्तित्व न्हाऊन निघालंच नाही.
दुःखाला हवी असते एक इवलीशी फुंकर, निवण्यासाठी.
दुःखाला हवी असते डोळाभर सावली, विसावण्यासाठी.
तुझ्या अहंतेच्या कठोर धगीत दुःख कसं होरपळत राहिलं;
खोटं हसत, उसासत दूर दूर गेलं; एकटं एकटं झालं.

## आधीच फार उशीर झाला आहे

हातात हात गुंफून आणलंस तूच
या अनोख्या स्वप्नपुरीच्या वळणावर.
आणि डोळ्यांनीच खुणावलीस धरतीवर ओठंगलेली दूरदूरची क्षितिजं
जी डोळयांच्या कुशीत कधी मावलीही नव्हती.
अलवार पावलांनी तरळताना या परिमळत्या यौवनगंधात
कितीकितीदा वाटलं, पूर्वेची कूस अजून उजवायचीच आहे,
नव्या जन्माची पहाट अजून व्हायचीच आहे.
आणि अचानक पाहिलं
तजेल देहावर उठलेल्या विद्रूप डागासारखं
बंद घराच्या रिकाम्या पायरीवर बसलेलं एक अश्राप असहाय
वार्धक्य
थिजलेल्या डोळयांचं एकटं...अगदी एकटं.
नको रे, आता हात सोडू नकोस.
आधीच फार उशीर झाला आहे.

## निपटून टाकले डोळे

निपटून टाकले डोळे
अखेरचे
काल रात्रीच्या कोरड्या वादळानंतर.
आता हसत राहीन तुझ्याबरोबर
डोळ्यांनी, ओठांनी, अश्रूंनी;
प्रेम करीन, प्रेम लेईन;
सुख देईन, सुख घेईन;
—दुःखाचं लावण्य तुला समजेतोवर.

## आठवते ती संध्या भिजली

आठवते ती संध्या भिजली
विसावलेली कातरवेळा ?
लवले माथे सलज्ज उचलुन
तुला मला ना बघत राहिली.
—तसे पहाया तुला मला अन्
अवघे स्थिरचर झाले निश्चल.
निंबतरूच्या शाखा स्नेहल
माथ्यावरती हळू वाकल्या.
खिडकीपाशी कळ्या उमलत्या
फुलता फुलता जरा थांबल्या.
तसे पाहता तुला मला अन्
क्षणी अभावित तृप्त नभाने
कसे उधळले भाळावरती
आशीर्वचही हर्षभराने
आठवते ना ?

## असेच हवे होते

मी दाराशी ओठंगून उभी राहिले
तू लगबगीनं जाताना,
वळणापर्यंत तुला पाहावं म्हणून.
तू मागं बघशील का ?
नाही बघितलंस.
वाटलं, असंच हवं होतं.
माझा हात हातात घेताना,
तेव्हाही, तू मागं पाहिलंच नव्हतंस.

## कडुनिंबाच्या झरोक्यातून

कडुनिंबाच्या झरोक्यातून आभाळाचं कुसुंबी हसू उमलताना
पाहिलं की नकळता हात जुळतात.
वेदकाळातील ऋषींचे हातही असेच जुळले असतील
आणि त्यांच्या तपस्वी ओठांवर कवितेचा जन्म झाला असेल.
तीच ही चिरयौवना उषा.
हे जितंजागतं जग नव्हतं तेव्हाही हीच होती;
आजही ही आहेच.
उद्या ?
उद्या हे रसरसतं जग नसेल
तेव्हाही त्या विस्तीर्ण अभावावर आभाळाचं
हेच अबोली हसू विलसत राहील.

## आज मीच झाले आहे

पूर्वेचं ताणलेलं तटतटलं धनुष्य :
आसन्नप्रसवेच्या महाकळेसारखं.
दिवसाचा तीर कधी सुटतोय त्यातून
म्हणून वाट पाहणारी मी.
आज मीच झाले आहे
एक ताणलेलं धनुष्य
आणि
पूर्वा आहे संथ, निवांत :
जपून पावलं टाकणाऱ्या लेकुरवाळ्या गर्भवतीसारखी.

## सारी दारं बंद केलीस तरी

सारी दारं बंद केलीस तरी टिचभर फटीतून ते शिरल्यावाचून राहणार नाही.
त्याची चाहूल लागण्यापूर्वीच ते आलेलंच असेल.
आणि त्याचं सोयरसुतक नाकारलंस
तरी ते पाळावंच लागेल,
कारण ते असेल सुतक तुझंच.
एखाद्या उदास संध्याकाळी सारवल्या आरशातून मालवत्या डोळ्यांनी
ते तुझ्याकडे पाहील.
ते डोळे तुझेच असतील.
त्यांच्यावर पाखर घाल.
आणि जे येणारच आहे त्याच्यासाठी
तुझ्या उंबऱ्यावर एक चिमुकलं स्वस्तिक रेखून ठेव.
म्हणजे त्याच्या हलक्या पावलांचा नाद विरण्यापूर्वीच ते तुझंच होईल.

## हळदमाखल्या अंगासारखा

हळदमाखल्या अंगासारखा कोवळा पिवळा संधिप्रकाश.
हळदुल्या अंगावर सांडलेल्या धारांसारखा हळवेला पाऊस
नितळ प्रकाशात न्हालेला.
आभाळाच्या सहस्र डोळ्यांतून सांडणारी ही वत्सलता
कडुनिंबाच्या पानांनी बाळमुठीत गच्च धरलेली,
हलकेच ओघळलेली.
केतकी लावण्याची ही आभा डोळे भरून पाहता पाहता
कलंडतं आभाळाचं भरलं पात्र
आणि कोवळ्या कांतीवर उतरतं अंधाराचं सावळं पिशाच
तेव्हा पश्चिमेकडे सूर्याचा दिवा विझता विझता भडकतो क्षणभर.

## काळ्या मातीत रुजलेले

काळ्या मातीत रुजलेले निळेसावळे डोंगर दूरवर :
युगायुगांच्या साक्षीदारांसारखे.
भल्याथोरल्या वारुळासारखी शेतातून उगवलेली
एक चिमुकली झोपडी.
आणि मातलेल्या हिर्वळीत विश्रब्धपणं चरणारी गुरं...
धावत्या गाडीच्या चौकटीतून हे सुस्थिर चित्र पाहते
तेव्हा
मरणाच्या छायेत चाचपडणाऱ्या जीवनाचा डळमळता पाया
क्षणभर स्थिरावल्यासारखा वाटतो.

## मी अशी स्वतःतच बोलू लागले

मी अशी स्वतःतच बोलू लागले
तर
मला स्वतःशीच बोलावं लागेल
आणि मग
तुझ्यापाशी बोलता येणार नाही
हे तुलाही कधी कळणार?

## आभार !

आभार !
सारंच पुसून टाकलंस आपल्या करंट्या हातांनी.
आभार !
एखादा उजळ कोपरा जरी ठेवला असतास,
आठवणीच्या झुळुकेपुरता, तरी मुष्कील झाली असती.
आभार !
पुन्हा एकदा आभार !
पण नियतीला आणि तुलाही पुसता आले नाहीत
त्या यौवनशाली कंठातून निघालेले ते कोवळे भावगभीर सूर,
त्यांचं इमान,
त्यांचं दर्द :
"मी टाकितो येथ काळीज हे फूल..."
बुडालेल्या बोटीच्या तरंगत्या वल्ह्यासारखे ते सूर
असे अवचित वर येतात अंतरीच्या तळातून
तेव्हा
तू तू राहत नाहीस
आणि मी मी उरत नाही.

## फक्त तुटून पडतं

अणकुचीदार लोखंडी सळईत रोवलेलं फूल
कसं ताठ ताठ असतं!
झुकत नाही जरासुद्धा;
झुकता येतही नाही.
पाठीचा कणा उसवला तरी ताठमानेनं उभं राहता राहता
एक दिवस काय होतं?
फूल वाकत नाही,
झुकत नाही;
फक्त तुटून पडतं.

## सारंच साजरं करायचं

सारंच साजरं करायचं :
रेशमी साडीच्या फलकाऱ्यात हसत मिरवायचं,
भाळावरल्या कुंकवाचं कौतुक सांगायचं,
नसलेल्या घराचं चित्र रंगवायचं,
तुझ्या कुशीत सारंच निरवायचं...

# घरच उरत नाही

घर असणं आणि नसणं,
ते कोसळणं आणि उभं असणं
यांतलं जमीनअस्मानाचं अंतर तसं कुणालाच समजत नाही.
घराच्या मोडक्या दारातून
आपल्याच प्राक्तनाला
एकटं...अगदी एकटं सामोरं जाणाऱ्यालाच ते समजतं.
आपले सारे पूल आपण आपल्या हातांनी जाळून टाकले
असं म्हणतात, तेव्हाही ते लक्षणेनंच घ्यावं लागतं.
पूल आपल्याच हातांनी जाळले जातात
तेव्हा पाऊलभर जागाही मागं परतायला उरत नाही.
पुढंच जावं लागतं न दिसणाऱ्या अंधाऱ्या वाटेनं
आपल्याच संचिताचं भूत माथ्यावर घेऊन.
धडपडत, चाचपडत का होईना,
कोणतीच वाट उंबऱ्यापर्यंत पोचत नाही.
कातरवेळेची दिवेलागण
आणि उंबऱ्यावरचं वेडंवाकडं स्वस्तिक
—कशालाच मग अर्थ उरत नाही.
कारण मग घरच उरत नाही.

२४९२ २२८४४ काव्य
REFBK-0022844
REFBK-0022844

मौज प्रकाशन

उपलब्ध कवितासंग्रह

बा० भ० बोरकर चित्रवीणा • चैत्रपुनव
अनिल सांगाती • दशपदी
बा० सी० मर्ढेकर मर्ढेकरांची कविता
ना० घ० देशपांडे शीळ • अभिसार
कांत वाजली विजेची टाळी • दोनुली
पु० शि० रेगे दुसरा पक्षी • प्रियाळ • गंधरेखा
इंदिरा मृगजळ • मेंदी
पद्मा नीहार
वसंत बापट मानसी
मंगेश पाडगावकर सलाम
आरती प्रभू जोगवा • नक्षत्रांचें देणें
शंकर रामाणी आभाळवाटा • पालाण
पद्मा लोकूर मनोरा
अंजली ठकार तुलसीदल
शरद साटम गाज